दैनिक www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

महाराष्ट्र सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे

नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)

लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

छत्रपती संभाजीनगर || वर्ष २ रे || अंक २२२ || शुक्रवार २६ जुलै २०२४ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||




# पाचोड शासकीय रुग्णालयाला ५० खाटाची मान्यता - खासदार भुमरेंच्या प्रयत्नांना यश

पैठण / किरण काळे

मागील अनेक वर्षांपासून पैठण तालुक्यातील पाचोड येथील रुग्णालयाला वाढीव खाटासाठी अनेक वर्षांपासून खासदार तथा पालकमंत्री संदिपान भुमरे हे शासन दरबारी प्रयत्न करत होते. या प्रयत्नाला यश मिळाले असून महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाने दि.२४ रोजी पाचोड येथील ३० खाटाच्या रुग्णालयास ५० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणिवर्धन वाढीव खाटास विशेष बाब म्हणून शासनाने मान्यता दिली आहे.यामुळे अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागला असून रुग्णांची होत असणारी हेळसांड आता थांबणार असल्याचे खासदार संदिपान भुमरे म्हणाले दैनिक सुर्योदय प्रतिनिधीशी बोलतांना म्हणाले.महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभागाचे उपसचिव शि.म.धुळे यांनी दि.२४ रोजी पाचोड येथील ३० खाटाच्या रुग्णालयाचे ५० खाटाच्या उपजिल्हा रुग्णालयात श्रेणिवर्धन करण्यास मान्यता दिली आहे.यामुळे पाचोड येथे आता ५० खाटाचे रुग्णालय आसनार असून यामुळे येणाऱ्या काळात या ठिकाणी नवीन वैद्यकीय अधिकाऱ्यांसह कर्मचारी यांची संख्या वाढनार आहे.या रुग्णालयात अत्याधुनिक नवीन सुविधाही येणाऱ्या काळात सुरू होणार आहे.यामुळे छत्रपती संभाजीनगरला जाण्याची रुणाना आवश्यकता भासणार नाही.परिसरातील हजारो नागरिकांना आता पाचोड येथेच चांगल्या दर्जाची आरोग्य सुविधा मिळणार असल्याचे खासदार संदिपान भुमरे म्हणाले.



## आठ वर्षीय बालिकेवर अत्याचाराचा प्रयत्न करणाऱ्या युवकाला सक्तमजुरी

आठ वर्षीय अल्पवयीन बालिकेला दुचाकीवर चक्कर मारुन आणतो म्हणून घेवून जाऊन तिच्यावर अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न चार गुरूजींनी थांबवला. त्या प्रकरणातील युवकाला विशेष पोक्सो न्यायाधीश रविंद्र पांडे यांनी एक वर्ष सक्तमजुरी आणि २ हजार रुपये रोख दंड अशी कठोर शिक्षा ठोठावली आहे.

किनवट पोलीस ठाण्याच्या हद्दीत राहणाऱ्या एका वडिलांच्या तक्रारीप्रमाणे १० ऑगस्ट २०२१ रोजी सकाळी ते आणि त्यांची पत्नी मिळून शेतात कामासाठी गेले होते. शेताजवळ असणाऱ्या रस्त्यावर त्यांची आठ वर्षाची बालिका ६ वर्षाचा बालक आणि ३ वर्षाचा बालक रस्त्यावर खेळत असतांना सतिश व्यंकटी जवादे हा

युवक आला आणि त्याने ८ वर्षीय बालिकेला दुचाकीवर बसून घेतले. ही बाब ६ वर्षाच्या बालकाने आपल्या आई-वडीलांना सांगितली की, दीदी दुचाकीवर चक्कर मारायला गेली आहे. आपला शेताचा शेजारी आहे म्हणून वडीलांना काही वाटले नाही. परंतू त्यांच्या गावाजवळच्या घाटातून दोन दुचाकींवर चार शिक्षक परत

येत असतांना त्यांना बालिकेच्या रडण्याचा आवाज आला आणि ते तेथे थांबून पाहणी करत असतांना रस्त्याच्या बाजूच्या खड्ड्यात सतिश व्यंकटी जवादे त्या बालिकेसोबत अतिप्रसंग करण्याचा प्रयत्न करत होता. शिक्षकांना पाहुन सतिश जवादे पळून गेला. शिक्षकांनी बालिकेची विचारपुस करून तिला आपल्या दुचाकीवर आई-वडीलांकडे आणले आणि घडलेला प्रकार सांगितला.

गावातील लोकांनी सतिश व्यंकटी जवादेला पकडून पोलीस ठाणे किनवट येथे नेले आणि त्याच्याविरुध्द तक्रार करण्यात आली. पोक्सो कायद्यान्वये गुन्हा दाखल झाला आणि सतिश व्यंकटी जवादेला अटक झाली. पोलीस उपनिरिक्षक एम.डी. राठोड यांनी सतिश व्यंकटी जवादे विरुध्द न्यायालयात दोषारोप पत्र दाखल केले.

## बिलानगर येथे घरफोडून १ लाख ९० हजारांची चोरी; फुलवळ शिवारातील गोडाऊनमध्ये चोरी

बिलालनगर येथे बंद घरफोडून चोरट्यांनी १ लाख ९० हजार १०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. तसेच फुलवळ ता.कंधार शिवारात सिमेंट गोडाऊनमधून चोरट्यांनी ४२ हजार रुपये किंमतीचा ऐवज चोरला आहे.

मोहम्मद कलीम मोहम्मद नवाज यांनी दिलेल्या तक्रारीनुसार १२ जुलैच्या मध्यरात्रीनंतर ते १३ जुलैच्या दुपारी १२ वाजेपर्यंत ते आपल्या बहिणीच्या घरी झोपण्यासाठी गेले असतांना त्यांच्या घराच्या समोरील भिंतीवरून आत व्हऱ्ड्यांत प्रवेश करून दोन कक्षाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. त्यातून सोन्या-चांदीचे दागिणे व रोख ९५ हजार रुपये असा एकूण १ लाख ९० हजार १०० रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. नांदेड ग्रामीण पोलीसांनी हा प्रकार भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा क्रमांक ६५०/२०२४ प्रमाणे दाखल केला आहे. या गुन्ह्याचा तपास सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक कदम हे करीत आहेत.शादुल नुरखान पठाण हे हल्ली एमआयडीसी फुलवळ ता.कंधार येथे राहतात. त्या ठिकाणी जे.के.अल्युमिनियम कंपनीचे सिमेंट गोडाऊन आहे. दि.२३ जुलै रोजी रात्री ते आपल्या मित्रांसह गोडाऊनमध्ये झोपले असतांना दुचाकीवर आलेल्या चोरट्यांनी गोडाऊनच्या खिडकीतून आत प्रवेश केला आणि दोन मोबाईल १७ हजार रुपये किंमतीचे आणि २५ हजार रुपये रोख रक्कम असा एकूण ४२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला आहे. कंधार पोलीसांनी हा घटनाक्रम गुन्हा क्रमांक २३९/२०२४ प्रमाणे दाखल केला असून पोलीस अंमलदार काळे अधिक तपास करीत आहेत.

## जिल्ह्यात गत २४ तासात सरासरी १० मि.मी. पाऊस

जिल्ह्यात २४ जुलै रोजी सकाळी संपलेल्या गत २४ तासात सरासरी १० मिलीमीटर पावसाची नोंद झाली असून



जिल्ह्यात एकुण ३७२.३० मिलीमीटर पाऊस झाला आहे.

जिल्ह्यात बुधवार २४ जुलै रोजी सकाळी संपलेल्या गत २४ तासात झालेला पाऊस मिली मीटरमध्ये तालुकानिहाय पुढील प्रमाणे, कंसात एकूण पाऊस : नांदेड- ९.७० (३४५.९०), बिलोली-८.२० (४१७.१०), मुखेड- ३.६० (४१२.३०), कंधार-२ (३८३.१०), लोहा-५.७० (३७१.८०), हदगाव-११.७० (३००.७०), भोकर-१९.१० (३३२.१०), देगलूर-४.२० (३२५.९०), किनवट-१६.५०(४८०.१०), मुदखेड १५.६० (३९७.१०), हिमायतनगर-१२.७० (३४१.९०), माहूर-१० (३५९.४०), धर्माबाद- १२.७० (४४२), उमरी- १४.६० (३१६.२०), अर्धापूर- १९ (४२०), नायगाव-९.९० (२६७.७०) मिलीमीटर आहे.

## वजिराबाद झोन तर्फे भारत विद्यालय व शक्तीनगर परीसर येथे वृक्षारोपन

नांदेड: पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेने शहरामध्ये एकुण २५००० वृक्षांची लागवड करण्याचे उदिष्ट समोर ठेवले असुन क्षेत्रिय कार्यालय क्र.४ वजिराबाद अंतर्गत गुरुपोर्णीमेचे औचित्य साधुन भारत विद्यालय येथे गुरुपोर्णीमा व वृक्ष लागवडीचा संयुक्तकार्यक्रम भारत विद्यालयाच्या परीसरात पार पडला.भारत विद्यालयातील मुख्याद्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांनी वृक्ष लावुन त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी स्विकारली असुन कार्यक्रमादरम्यान सहाय्यक आयुक्त संजय जाधव यांनी विद्यार्थ्याना वृक्षाचे महत्व पटवुन दिले. याप्रसंगी मुख्याद्यापक साहेबराव चव्हाण यांनी विद्यार्थ्यांना वृक्ष लावण्याचे आवाहन करुन लावण्यात आलेल्या वृक्षाचे संगोपन शाळेतील विद्यार्थी व शिक्षकवृंद करतील असे अस्वस्थ केले. भारत विद्यालय परीसरात १६० झाडे वृक्षारोपन करण्यात येत आहेत.या कार्यक्रमाचे अध्यक्ष गौतम कवडे तर प्रमुख पाहुणे म्हणुन संजय जाधव तसेच भारत विद्यालयाचे मुख्याध्यापक साहेबराव चव्हाण, मारोती चिंतले, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त रमेश चवरे, रावण सोनसळे, तसेच अजहर अली, सुरेंद्रपालसिंघ, उल्हास महाबळे पर्यवेक्षक, मोहन लांडगे हे उपस्थित होते.याचवेळी शक्तीनगर येथील संत रविदास महाराज सभागृहाच्या परीसरामध्ये सुध्दा ८५ झाडाचे वृक्षारोपन करण्यात आले असुन या ठिकाणी शक्तीनगर परीसरातील सोसायटीचे चेअरमन अशोक गोरे, गजानन टाक, गणेशसिंह ठाकूर, गंगाधर वंगलवार, विनायक वाघमारे, मारेती वाघमारे, अथर्व सोनसळे, बाळफ मंठाळकर, प्रशांत कांबळे, विजय वाघमारे, शेख खदीर, ईरशाद अली, शरद काळे, भरत रत्नपारखे, आर्शीवाद चव्हाण, बबन लोखंडे, गोपाळ चव्हाण, रजणीकांत सुनेवाड, देविदास शेंडगे, तुराब अली, नितेश ठाकूर, अनिल लोखंडे इत्यादी कर्मचा-यारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन सौ. देशमुख यांनी केले. तर आभार प्रदर्शन संतोष तुप्तेवार यांनी केले.

## अनैतिक संबंधातून अवैध सावकारी करणारी इंद्राची परी असलेली हिटलर महिला कोण? अश्यांना पाठ राखण करणारे कोण आहेत? महिला आहे की पुरुष किंवा विभागातील आहे हे कोण? गोसे विभागात जाहिरातीसाठी दर पत्रक, बोगस बिल देणारा पत्रकार कोण? बातमी लिहिणारा ब्लॅकमेलर हिटलर पत्रकार कोण? तो दुसऱ्या पत्रकाराला तोतया म्हणतो तो कोण?

**क्रमाशा ३**

दैनिक सूर्योदय

निश्चल येनोरकर

अशा प्रकारच्या बातम्या प्रसारित होतात शहरामध्ये काही लोकांच्या प्रतिक्रिया येण्यास झाली सुरुवात .

पुढील नवीन नवीन विषयाच्या संदर्भात क्रमानुसार बातम्या प्रसारित होणार या कल्पनेने आलेली प्रतिक्रिया जाणून घ्या आणि आपले काही दुःख असलेली प्रतिक्रिया आमच्यापर्यंत पोहोचवा.

उसने मागून दिले त्यात शिकार झालेल्या महिलेची आप बिती प्रतिक्रिया

शहरामध्ये एका दुःख भरी, महिलेची दास्तान सांगत असतानी जीवनामधील कठीण परिस्थिती कशी काय दिवस काढत आहे काही काळापूर्वी माझे वडील यूपीमधून भंडारा शहरात वास्तव्यास आले .त्यानंतर माझे वडीलानी लग्न करून दिल्यानंतर माझे पती काही दिवसापूर्वीती राहले आणि मला घरात मोलकरीण म्हणून काम करावे लागले त्यानंतर माझ्या पतीमध्ये दुराव निर्माण झाल्यानंतर कालांतराने माझे पती माझ्यापासून दूर झाले कारण दुसऱ्या महिलेसोबत त्यांचे अनैतिक संबंध असल्याने मला सोडून त्या महिलेसोबत राहायला सुरुवात झाली मला मुलं बाळ नसल्याने मला घरी पण जागा मिळाली नाही

त्यातच भावांनी सुद्धा मला कोणतीही मदत न करता रस्त्यावर सोडून दिले असता मग मी काय करावे याकडे दर दर भटकत होती यातच मला काही आगळवेगळे छंद असल्याने मी छोटेसे काम करून उदरनिर्वाह चालवीत आहे .अशाच प्रकरणांमध्ये शिकार झालेल्या महिलेने आप भीती विषयावर चर्चा केली. यात एका महिलेकडून उधारी रक्कम मागितली ज्यांना गरज होती त्या महिलेसोबत दुसऱ्या महिलेच्या बोलण्यावरून तिसऱ्या महिलेला रक्कम मागून देणे पडले भारी.

ज्या महिलेला पैशाची गरज होती त्या महिलेला त्यावेळेस दुसऱ्या महिलेनी सोबत जाऊन तिला मदत म्हणून केली परंतु आता त्या महिलेची गरज भागवून दिल्यानंतर दुसऱ्या महिलेने पैसे मागतले असता कारण तिसऱ्या महिलेकडून उसने वारी रक्कम घेतलेल्या महिलेस वापस मागितले असता ती महिला एवढ्या कठोर मनाची होऊन दुसऱ्यांनी केलेली मदत ही विसरून जाऊन उलट मदत करणाऱ्या महिलेला गाल बोट ठेवून धमकी देते आणि तू मागून दिलेले पैसे देत नाही यात तू माझे काय बिघडवशील मी तुझ्या नावाने अवैध सावकारी करण्याचे आरोप तुझ्यावर करीन माझे पती एका विभागात कार्यरत आहेत आणि माझी खूप दूर वरी पोच आहे .

यानंतर उद्याला बाकी माहिती नवीन विषयाच्या संदर्भात येणार.

या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
# सूर्योदय
शुक्रवार २६ जुलै २०२४



या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

## कोल्हापूर प्रशासन करतयं डोळ्यात तेल घालून पहारा.... मुसळधार पावसाने जनजीवन थंडावले पंचगंगा नदीची धोका पातळी ४३ फूट १ इंचावर

कोल्हापूर २५: कोल्हापूर जिल्ह्यावर पुन्हा एकदा महापुराची टांगती तलवार आहे. पंचगंगा नदीने धोका पातळी गाठल्याने



कोल्हापूरकर पुन्हा एकदा धास्तावले आहेत. पंचगंगा नदीची धोका पातळी ४३ फूट १ इंचांवर गेली आहे. त्यामुळे आता जितकी पाण्याची पातळी वाढत जाईल तितकं पाणी कोल्हापूर शहराच्या आणि महामार्गावर सुद्धा येण्याची शक्यता आहे.

त्यामुळे संभाव्य परिणाम लक्षात घेऊन जिल्हा प्रशासनाकडून हालचाली सुरु आहेत. पुरग्रस्त भागातून स्थलांतर सुरु करण्यात आलं आहे. जिल्ह्यातील पंचगंगा नदीसह सर्वच नद्यांची पुरसदृश्य स्थिती असल्याने वाहतुकीवर विपरित परिणाम झाला आहे. जिल्ह्यातील ८१ बंधारे पाण्याखाली गेल्याने पर्यायी मार्गांनी वाहतूक सुरु आहे.

## इन्फिगो आयकेअर हॉस्पिटलचे सुप्रसिद्ध रेटिना तज्ञ् डॉ. प्रसाद कामत दि. २६ व २७ जुलै रोजी इन्फिगो हॉस्पिटलचा खेड शाखेत उपलब्ध.

इन्फिगो आयकेअर हॉस्पिटल खेड, दापोली, मंडणगड विभागातील डोळ्यांचा समस्यांमधील गरज समजून या तिन्ही तालुक्यातील रुग्णांसाठी अतिशय महत्वाची सेवा उपलब्ध करीत आहोत. संपूर्ण रत्नागिरी जिल्ह्यामध्ये डोळ्यांच्या पडदयावरील (रेटिना) आजारांसाठी तपासणी व उपचार करण्याकरिता योग्य ती सुविधा उपलब्ध नाही, त्यामुळे डोळ्यांच्या पडदयाचा समस्यांसाठी रुग्णास मुंबई किंवा पुण्याला जाण्याशिवाय पर्याय उरत नाही आणि त्यामुळेच इन्फिगो आय केअर हॉस्पिटलने या सुविधा खेड येथे उपलब्ध केल्या आहेत. तसेच डॉ. प्रसाद कामात हे आंतरराष्ट्रीय दर्जाचे सुप्रसिद्ध रेटिना तज्ञ् असून रेटिना विभागातील अवघड व किचकट शस्त्रक्रिया या वेळी करणार आहेत. इन्फिगोमध्ये रेटिना विभागातील उपचार करण्याकरिता अत्याधुनिक व सुसज्ज निदान यंत्रणा आहेत. तरी, ज्यांना अचानक अंधत्व आले असल्यास, डोळ्यांपुढे काळे ठिपके आले असल्यास, डायबेटीस असल्यास, चष्माचा नंबर सतत बदलत असल्यास, मायनस ३ पक्षा जास्त नंबरचा चष्मा असल्यास लवकरच या सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा असे आवाहन इन्फिगोकडून करण्यात आले आहे.

## आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बैठक

आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी गुहागर विधानसभा क्षेत्रातील खेड व चिपळूण तालुक्यामधील सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक चिपळूण पुष्कर हॉल येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवसेना नेते आ.रवींद्र फाटक यांनी विधानसभा क्षेत्रात पक्ष संघटना बांधणीसाठी व विधानसभा निवडणुकीच्या तयारीकरिता आवश्यक त्या सूचना देऊन



मार्गदर्शन केले.ङ्गयावेळी, माजी आमदार श्री.सदानंद चव्हाण, शिवसेना सचिव व गुहागर विधानसभेचे निरीक्षक अभिनेते श्री. सुशांत शेलार, जिल्हाप्रमुख श्री. शशिकांत चव्हाण, जि.प सदस्य अरुण चव्हाण व सर्व प्रमुख पदाधिकारी, युवासेना, महिला आघाडी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.(छाया : ओंकार रेळेकर)

## संभाजी ब्रिगेड पक्षाची कोकण विभागीय आढावा बैठक आणि नियुक्तीचा कार्यक्रम संपन्न...

जगभरातील गाजलेल्या अनेक संघटना अनेक पक्ष आहेत परंतु सगळ्यात महत्वपूर्ण आणि शिव शाहू फुले आंबेडकर यांच्या विचारांवर गाजलेली संघटना आणि नववार्चित पक्ष म्हणजे संभाजी ब्रिगेड पक्ष होय आताच्या राजकारणात जलद गतीने मुसंडी घेणारा पक्ष म्हणून महाराष्ट्रात कानाकोपऱ्यात गाजावाजा होत आहे असा पक्ष म्हणजे संभाजी ब्रिगेड पक्ष होय.ङ्गवाम मार्गाने जाणारे अनेक लाखो तरूण संभाजी ब्रिगेड विचारांची मशाल घेऊन गुण्यागोविंदाने जगात झळकणारे अनेक तरूण संभाजी ब्रिगेड विचारांनी तयार होत आहेत हातात दगडा ऐवजी महामानवांचे महान विचार घेऊन डोके,मन, मनगट मजबूत करून समाजात विचारांची फळी उभी करत आहेत आणि याचे महत्त्वाचे कारण म्हणजे संभाजी ब्रिगेड पक्ष



होय.संभाजी ब्रिगेड सध्या जनतेच्या गळयातील ताईत बनले आहे समाजात जोरदार वाढत आहे याचे कारण म्हणजे संभाजी ब्रिगेड पक्ष प्रमुख प्रदेश अध्यक्ष अँड मनोज दादा आखरे यांच्या अध्यक्षतेखाली मार्गदर्शनाखाली आमच्या सारखे अनेक मावळे घडवले जात आहेत.कार्यकर्ते निर्माण झाले आहेत.अध्यक्ष महोदय यांच्या भाषणात म्हटले आहे कार्यकर्ता म्हणजे राजकारणातील पक्षाचा आतील गाभारा, जीव आहे कार्यकर्ता आहे तर पक्ष आहे कोणताही प्रमुख आहे.आणि म्हणूनच पक्षात कार्यकर्त्यांना अध्यक्ष मनोदादांनी महत्त्वाचे स्थान दिले आहे अशा विचाराने धावणारा पक्ष म्हणजे संभाजी ब्रिगेड होय.ङ्गदिनांक २२/०७/२०२४ रोजी पनवेल शासकीय विश्रामगृहात प्रदेश अध्यक्ष अँड मनोज दादा आखरे यांच्या हस्ते प्रदेश कार्याध्यक्ष शिवश्री सुधीर भाऊ देशमुख, मुंबई अध्यक्ष शिवश्री सुहास राणे, कोकण विभागीय अध्यक्ष शिवश्री सुर्यकांत भोसले, ठाणे पालघर विभागीय अध्यक्ष डॉ योगेश पाटील, कोकण विभागीय प्रमुख संघटक शिवश्री अविनाश पाटील, जिल्हा रायगड उत्तर अध्यक्ष शिवश्री परमानंद जांभळे , महेश मोरे, दत्ता शेळके माजी रायगड जिल्हा अध्यक्ष शिवश्री मोरेश्वर भोईर,मा.स्वप्निल म्हात्रे यांच्या उपस्थितीत नववार्चित शिवश्री आकाश अशोक पांचाळ यांची जिल्हा रायगड दक्षिण अध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली या कार्यक्रमात अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.जय जिजाऊ जय शिवराय ङ्गदेश की ब्रिगेड संभाजी ब्रिगेड.

## तु. बा. कदम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ‘‘रत्नागिरी जिल्हा अ‍ॅथलेटिक चॅम्पियनशिप’’ मध्ये घवघवीत यश

तु. बा. कदम महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे ‘‘रत्नागिरी जिल्हा अ‍ॅथलेटिक चॅम्पियनशिप‘‘ मध्ये घवघवीत यश आपल्या महाविद्यालयातील खालील विद्यार्थ्यांनी ‘‘रत्नागिरी जिल्हा अॅथलेटिक चॅम्पियनशिप‘‘ मध्ये घवघवीत यश संपादन केले आहे.१) शिवम पांडुरंग चाळके – ३००० प्रथम २) गणेश मनोहर बांद्रे – लांब उडी द्वितीय द्वितीय ३) स्वराज अंकुश पांगळे – ५००० द्वितीय १०,००० . तृतीय ४) अनिल भार्गव शिंदे – १०,००० . द्वितीय ३००० तृतीय त्यानिमित्त कुणबी शिक्षण प्रसारक संस्था, खेड – मुंबईचे



अध्यक्ष मा. भि. म. गोवळकर साहेब, सचिव मा. अ‍ॅड. तु. ल. डफळे साहेब, सह–साचिव मा. द. भि. धुमक साहेब, खजिनदार मा. राजाभाऊ बैकर साहेब, संस्था सदस्य मा. दत्ताशेठ बैकर साहेब, मा. बाबाराम तळेकर साहेब तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य व्हि. एन. साळुंखे सर, डॉ. जे. व्ही. पाताडे, प्रा. व्हि. वाय. चोपडे सर, प्रा. जे. के. शेख सर, सौ. तळेकर मॅडम, श्री. संजय गोमले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करुन त्यांना पुढील राज्य अ‍ॅथलेटिक चॅम्पियनशिप करिता शुभेच्छा दिल्या आहेत.

## बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणारा रस्ता खडतर खड्ड्यांची झाली तळी, मार्ग काढतांना तारेवरची कसरत

पाली/बेणसे
(धम्मशील सावंत)

अष्टविनायक तीर्थक्षेत्र पाली येथील श्री बल्लाळेश्वर मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्याची खूप दुरावस्था झाली आहे. या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत.



पाली नगरपंचायत तर्फे या ठिकाणी तात्पुरती उपाययोजना म्हणून खडी टाकण्यात आली होती. मात्र ही खडी बाहेर येऊन पुन्हा मोठाले खड्डे पडले असून पावसाचे पाणी साठून त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त झाले आहे. परिणामी येथून मार्ग काढतांना भाविक, पादचारी, विद्यार्थी व वाहन चालक यांना तारेवरची कसरत करावी लागत आहे.

काही दिवसांपूर्वी खड्डे भरण्यासाठी टाकलेल्या खडीवरून घसरून पाच ते सहा बाईकस्वार जखमी झाले होते.

वाहने जाऊन आता ही खडी आजूबाजूला पसरली असून त्या ठिकाणी आणखी मोठे खड्डे तयार झाले आहेत. तसेच या खड्ड्यांमध्ये पाणी साचून राहते.

आणि वाहतुकीला व चालण्यास अडथळा निर्माण होत आहे. शिवाय खड्ड्यात वाहने जोरात आदळतता, तसेच खड्ड्यातील पाणी आजूबाजूला असलेल्या दुकानांत व पादचाऱ्यांवर उडून त्यांना हकनाक त्रास सहन करावा लागतो. याच ठिकाणी सब रजिस्ट्रेशन ऑफिस देखील आहे. इतर व्यापारी दुकाने आहेत. त्यांना सुद्धा या खड्ड्यांचा त्रास होत आहे.

## बागमांडला न्यू इंग्लिश स्कुलचे पत्रे फुटून नुकसान

श्रीवर्धन कोलमांडाले सोपान निंबरे; तालुक्यात दोन दिवस सतत पडणाऱ्या वादळवाऱ्यासह मुसळधार पावसाचा जोरदार फटका बागमांडला न्यू इंग्लिश स्कुलला



बसला आहे. दि २४ च्या रात्री मुसळधार पाऊस व वादळवाऱ्याने शाळेच्या सहावी व सातवी या दोन वर्गाचे पत्रे फुटून मोठे नुकसान झाले. पत्रे वर्गातील बेंचवर पडून बेंचदेखील नादुरुस्त अवस्थेत आहेत.इतर वर्गांच्याही पत्रर्यांची तुटफुट झाली आहे

यामुळे या वर्गांमध्ये पावसाचे पाणी येत असून मुलांना वर्गात बसने त्रासदायक व धोक्याचे झाल्याचे पहायला मिळत आहे. तलाठी पालवे यांच्याकडून सदर घटनास्थळी पहाणी करून

पंचनामा करण्यात आले आहे. मागील चक्रीवादळामध्येही शाळेचे मोठे नुकसान झाले होते परंतु शासनाकडून कोणतीही नुकसान भरपाई मिळाली नव्हती यावेळी शासनाकडून वेळेवर नुकसान भरपाई मिळावी अशी शिक्षक व पालकवर्गाकडून मागणी करण्यात येत आहे.

## तळा शहरात वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस.विदयुत तारा तुटल्या मात्र अनर्थ टळला.

तळा कृष्णा भोसले.

तळा तालुक्यात बुधवारी रात्री वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. या वादळाने अनेकांचे घरावरील छप्परे उडाली असून पावसाने कहर केला आहे

विदयुत पोल या वारयाने वाकले असुन भर बाजारात



रस्यावर विदयुत वाहीनी तुटून पडली मात्र व्यापारी वर्गाच्या सतर्कतेमुळे जिवितहानी टळली आहे. सध्याच्या घडीला पाऊस धोधो पडत आहे. हवामान खात्याने गरज असल्यासच घराबाहेर पडावे अन्यथा बाहेर पडू नये अशा सुचना दिल्या आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय पत्ता : लक्ष्मण फकिरबा कांबळे छत्रपती संभाजीनगर कांचनवाडी संभाजीनगर पत्ता पैठण रोड बेस्ट प्राईस कांचनवाडी डेंटल हॉस्पिटल जवळ (संपादक आवृत्ती), संपर्क : ९०२२६४३७७३ किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड– ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )